Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/ १४९९
पुणे - ४११ ००४
दिनांक - ३१/०१/२०२०

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :-मार्च २०२० च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२० साठी सर्व विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांना मार्च २०२० च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahasscboard.in या संकेतस्थळावर **शनिवार दिनांक ०१/०२/२०२०** पासून School login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उदभवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा व विभागीय मंडळाने व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी संपर्क साधावा.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना व विद्यार्थ्यांना याप्रमाणे अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/३९६१
कोल्हापूर ४१६००४
दिनांक:-३१/०१/२०२०

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**मार्च-२०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांच्या (HALL TICKET) तारखांबाबत**

राज्य मंडळाने जा.क्र रा.मं./परीक्षा-७/१४९९ दि. ३१/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन ऑनलाईन प्रवेशपत्रे काढून घेणेबाबतची कार्यवाही करावी.

१/२/२०२०

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर –४१६००४

# *प्रकटन*

**विषय : मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (HALL TICKET).. ..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुख,शिक्षक,विद्यार्थी, पालक सर्वांना या प्रकटनाद्वारे सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी) परीक्षा **मार्च–२०२०** साठी ऑनलाईन प्रवेशपत्रे **(HALL TICKET)** उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळांना मार्च–२०२० च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (HALL TICKET) ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने मंडळाच्या **www.mahasscboard.in** या संकेतस्थळावर **शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२०** पासून school login मध्ये download करण्याकरीता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेश पत्रे (HALL TICKET) उपलब्ध करुन घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१) मार्च –२०२० साठी या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांनी इ.१० वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करुन विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२) प्रवेशपत्र (HALL TICKET) ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने प्रिंटींग करताना **विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेण्यात येऊ नये**. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का मारुन स्वाक्षरी करावी.

३) प्रवेशपत्रामध्ये (HALL TICKET) **विषय व माध्यम बदल** असतील तर त्यांच्या दुरुस्त्या माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळात जाऊन करुन घ्यावयाच्या आहेत.

**४) प्रवेशपत्रावरील (HALL TICKET) फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्यांचे नांव, जन्मतारीख व जन्मस्थळ इ.संदर्भातील दुरुस्त्या माध्यमिक शाळांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे निर्धारीत शुल्कासह त्वरीत सादर करावयाची आहे.**

५) प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

६) फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापकांनी शिक्का मारुन स्वाक्षरी करावयाची आहे.

तरी मार्च–२०२० मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी , पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

**दिनांक :– ०१ फेब्रुवारी २०२०**

**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**